




**गोदरेज कपाट व एक महिन्याचे रेशन वाटप समारंभ**

नारायणराव काळोखे नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित यांच्या सौजन्याने व रोटरी क्लब तळेगाव दाभाडे सिटी यांच्या माध्यमातून तळेगाव दाभाडे येथील स्वातंत्र्यवीर सावरकर गुरुकुलास एक महिन्याचे रेशन व गोदरेज कपाट वाटप समारंभ नुकताच गुरुकुल मध्ये संपन्न झाला. महाराष्ट्रातल्या विविध भागातील गरीब होतकरू आर्थिक मागास कुटुंबातील 47 विद्यार्थी या गुरुकुलात शिक्षण घेत आहेत रोटरी सिटी चे संस्थापक अध्यक्ष विलास काळोखे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना भेट देण्यात आली कार्यक्रमाचे प्रास्ताविक गुरुकुलचे अध्यक्ष सुरेश नाना दाभाडे यांनी करताना गेल्या पंचवीस वर्षाचा गुरुकुल चा इतिहास कथन केला.गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी आपण सर्वतोपरी मदत करू असे प्रतिपादन विलासराव काळोखे यांनी केले तर रोटरीच्या कार्याची माहिती दिलीप पारेख यांनी दिली.राज्याच्या विविध भागातील गरीब घरातील मुलांसाठी तंत्रज्ञानयुक्त शिक्षणाची मदत करूअसे प्रतिपादन अध्यक्ष सुरेश शेंडे यांनी केले.निवृत्त शिक्षकांच्या सहकार्याने गुरुकुलातील विद्यार्थ्यांना विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी आपण ज्ञानदानाचे काम करणार असल्याची ग्वाही सेक्रेटरी भगवान शिंदे यांनी दिली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप टेकवडे यांनी केले तर उपाध्यक्ष किरण ओसवाल यांनी आभार मानले सदर प्रसंगी गुरुकुलच्या वतीने विलास काळोखे यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला

संजय मेहता, संजय वाघमारे, प्रशांत ताये, सुनील महाजन, संतोष शेळके, शरयू देवळे, प्रशांत ताये,रामनाथ कलावडे सुनंदा वाघमारे,तानाजी मराठे, रघुनाथ कश्यप इत्यादींनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले







पारनेर समर्थ

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क 7507759999 8788168275

बुधवार दि. १९ जुलै २०२३ | संस्थापक संपादक : सुरेश पाटील खोसे | संस्थापक उपसंपादक : ठकाराम (दादा) गायखे

# रोटरी क्लब ऑफ तळेगाव दाभाडे सिटी यांचा आप्पा पवार यांना २०२३-२४ चा लक्षवेधी पुरस्कार

**रांजणगाव गणपती - प्रतिनिधी**

तळेगाव दाभाडे येथील रोटरी क्लबच्या आठव्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने व १ जुलै डॉक्टर डे च्या निमित्ताने १४ जुलै २०२३ रोजी शिरूर तालुक्यातील भांबुर्डे येथील महाराष्ट्र सह अनेक राज्यातील गड किल्ले सर करणाऱ्या श्री. आप्पा बाबुराव पवार यांना रोटरी क्लबचे संस्थापक प्रकल्प प्रमुख श्री विलास शेठ काळोखे यांच्या हस्ते लक्षवेधी पुरस्कार देण्यात आला.



यावेळी प्रेसिडेंट श्री. सुरेश शेंडे, व्हाईस प्रेसिडेंट श्री. किरण ओसवाल, रोटरी क्लबचे सेक्रेटरी श्री. भगवान शिंदे तसेच रोटरी क्लबचे प्रकल्प प्रमुख श्री. दिलीप पारेख, श्री. ऋतिक जावळे, आणि श्री आनंदराव देशमुख इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

गिरीभ्रमणाचे अनेक विश्वविक्रम आप्पा पवार यांच्या नावावर आहे.तसेच सर्वांच्या उपस्थितीत रोटरी क्लब ऑफ तळेगाव दाभाडे सिटी वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

# BIRTHDAYS




**Rtn. Varsha Kharage - 5th July**

**Rtn. Santosh Maikar - 9th July**

**Rtn. Vilas Kalokhe - 14th July**

**Rtn. Sunil Mahajan - 21st July**

**Rtn. Sourabh Mehta - 31st July**